स्थापना - २३.९.१९६१ र.नं.बी.डी.एन.१२९७

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लिमिटेड चिखली, जि. बुलडाणा**

(भारतीय रिझर्व्ह बँक लायसेन्स नं.यु.बी.डी.एम.एच.८०६ पी.दि.२७.१२.८६)

जिल्हा बुलडाणा ४४३२०१ फोन : २४२०३९,२४२१९६,२४२९७९,२४४६५१

# वार्षिक साधारण सभेची नोटीस

चिखली दिनांक १८.७.२०१८

**बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, दि चिखली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,चिखली या संस्थेची ५७ वी वार्षिक साधारण सभा, रविवार दिनांक ०५/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता रानवारा रिसॉर्ट, हॉटेल रानवारा परिसर, जाफ्राबाद रोड, चिखली येथे घेण्याचे ठरविले आहे. सभेत खालील विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले आहेत.**

**तरी विनंती की, सभेस अवश्य उपस्थित राहण्याची कृपा करावी.**

## सभेपुढील विषय....

१. मागील आमसभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. बँकेच्या कामकाजाचा दिनांक ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, हिशोबाची पत्रके (ताळेबंद व नफातोटा पत्रक इ.) वाचून स्विकृत करणे.
३. बँकेच्या २०१७-२०१८ सालच्या वैधानिक अंकेक्षण अहवालाची नोंद घेणे.
४. वैधानिक अंकेक्षण अहवालातील दोष दुरूस्ती अहवालास मंजूरात देणे.
५. सन २०१७-२०१८ सालच्या नफ्याचे विनियोजन मंजूर करणे.
६. सन २०१८-२०१९ सालचे अंदाजपत्रक व विकास योजनेस (Annual Business Plan) मंजूरात देणे.
७. सन २०१७-२०१८ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे असलेल्या कर्जाचा तपशील सादर करणे.
९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ४९ अनुसार मा. लेखापरिक्षक यांनी प्रमाणीत केलेले बुडीत व संशयीत कर्ज निर्लेखीत करण्यास मान्यता देणे व मा.संचालक मंडळाने तडजोड योजने अंतर्गत दिलेल्या सुटीस मान्यता देणे.शासनाचे एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
१०. भारतीय रिझर्व्ह बँकेने अर्बन बँकांसाठी 'व्यवस्थापन समिती' (बोर्डऑफ मॅनेजमेंट) स्थापन करणे संदर्भात तयार केलेल्या प्रारूप मसुद्यावर विचार विनिमय करणे.
११. आपल्या बँकेकरीता सन २०१८-२०१९ या आर्थीक वर्षाकरीता वैधानीक लेखा परिक्षकाची नेमणुक करणे व त्यांचा मोबदला ठरविणे.
१२. बँकेचे सदस्य व कर्मचारी यांच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी केलेल्या बँकेच्या प्रयत्नांची नोंद घेणे व पुढील वर्षाकरीता शिक्षण व प्रशिक्षणासाठी केलेल्या नियोजनास मंजूरात देणे.
१३. बँकेच्या चिखली येथील मुख्यालयाच्या मागील रिकाम्या जागेत अतिरिक्त बांधकामास मंजूरात देणे.
१४. बँकेचे जुने वाहन विक्री करणे व नवीन वाहन खरेदी करणेबाबत मंजुरात देणे.
१५. मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**संचालक मंडळाचे आज्ञेवरून**

| | |
|---|---|
| **स. शं. भंगिरे** | **स. भ. गुप्त** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

टिप : १) गणसंखेच्या अभावी सभा तहकुब झाल्यास, तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल व या सभेत वरील सुचनेत नमुद केल्याप्रमाणे सर्व कामकाज होईल. या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२) कृपया सभासदांनी या वार्षीक सभेची नोटीस व उपस्थीती प्रमाणपत्र माहीती भरून सोबत आणावे.
३) ज्या सभासदांना वार्षीक अहवाल पाहीजे असेल त्यांनी तो नजिकच्या शाखेतून प्राप्त करावा.
४) मा.सभासदांसाठी सभास्थानी आमसभेपुर्वी १० वाजेपासून नोंदणी व भोजन सुरू राहील. तरी कृपया सभासदांनी भोजनाचा आस्वाद घ्यावा ही नम्र विनंती.